Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# भारतातील बालकामगार आणि मानवाधिकार

**धनराज भिमराव राठोड**
अर्थशास्त्र विभाग
जवाहरलाल नेहरू कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
वाडी नागपूर.

***सारांश -***

*बाल कामगारांची समस्या ही जगातील प्रत्येक देशासमोरील एक भीषण समस्या आहे. 'एशियन लेबर मॉनिटरच्या' संशोधनामध्ये भारताच्या संदर्भात प्रत्येक तीन घरामागे 1 मूल यामध्ये राबताना दिसते, ही संख्या सतत वाढत चाललेली आहे. नवल म्हणजे त्यांचे प्रश्न मांडायला, त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून द्यायला,समाजात त्यांना न्याय मिळवून द्यायला, त्यांचा प्रतिनिधी असण्याची शक्यता नसल्याने ते प्रश्न प्रौढ व जबाबदार प्रतिनिधींनीच सोडवायचे आहे. ही समस्या सर्वस्वी नाहीशी करणे किंवा बुडापासून निपटून काढणे तर अशक्यच आहे, निदान त्यांच्या कामाचे स्वरूप कामाचे तास त्यांच्या कामाबद्दल दिला जाणारा मोबदला आणि त्यांच्या शिक्षणाची त्यांच्यावर संस्कार करण्याची त्यांना पुरेसा व सकस आहार देण्याची त्यांना त्यांच्या बालपणाचा आनंद लुटू देण्याची खेळण्याची व योग्य शिक्षण देण्याची व अन्य सुविधा पुरविल्या जाव्यात याची कायद्याने व प्रत्यक्ष वर्तनाने काळजी घेण्याची तरतूद समाज विचारवंतांना कार्यकर्त्यांना शक्य आहे. बाल वयातील खडतर अनुभवांमधूनच लैंगिक गुन्हेगारी ,वेश्याव्यवसाय ,व्यसनाधीनता ,निरक्षरता, गुंडगिरी, विषमता ,इत्यादी समाज संस्कृती विघातक प्रवृत्ती वाढायला सहाय्य होते. भारतामध्ये दारिद्र्यरेषेखाली असलेल्या व लहानपणापासूनच बाल कामगारीमध्ये ढकलून दिलेले कामगार व त्यांना मिळालेल्या अनुभवातूनच ते मोठे होत असतात. ते आपल्या मुलांना त्याच प्रकारे घडवू पाहतात. त्यामुळे समाजाची सुरक्षितता व नैतिकताही धोक्यात येते.*

***बीज शब्द :-*** *मानवाधिकार, मानवी हक्क, बालकामगार ,विविध कायदे ,समाज विघातक प्रवृत्ती.*

**प्रस्तावना -**

30 एप्रिल हा बालकामगार दिन म्हणून पाळला जातो त्यानिमित्ताने बालकामगार समस्या आणि बालकामगार समस्या बद्दलचा विचारही दरवर्षी कसा वाढत चाललेला आहे हे लक्षात येते. सन 2011 मध्ये देशात करण्यात आलेल्या बालकामगार सर्वेक्षणानुसार भारतात 43 लाखाहून अधिक बालकामगार असल्याचे दिसून येते हे चित्र अस्वस्थ करणारे आहे. लहान मुलांना त्यांच्या उमलत्या वयात कामाच्या रामगाड्याला जुंपणे हा एक प्रकारे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने सुद्धा गुन्हाच म्हणायला पाहिजे जे उद्याचे नागरिक आहे. या भूमिकेतून त्यांचे पालन पोषण करणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांना शिस्त लावणे, सुसंस्कारित करणे, हे त्यांच्या पालकांची जबाबदारी असते. केवळ पालकांचीच नव्हे तर समाजाची एक नैतिक जबाबदारी आहे अशा सुसंस्कृत समाजात मानला जातो. पण समाजातील दारिद्र्य रेषेखालील वर्ग जो आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेला घटक आहे. तो आपले कर्तव्य पालन करू शकत नाही. कारण कुटुंबाचा आर्थिक भार उचलण्याचे ओझे पालकांना नाईलाजाने या अपरिपक्व वयाच्या मुलांवर टाकावे लागते. कुटुंबातील खाणाऱ्या तोंडांची वाढती संख्या, पालकांची व्यसनाधीनता ,शैक्षणिक सुविधेचा अभाव, यासारख्या सामाजिक,सांस्कृतिक प्रश्नांशी ही बालकामगाराची समस्या जुळलेली आहे.

19 व्या शतकातील वाढत्या कारखानदारीने शहराकडे कामगारांचा लोंढा वाढला या कारखान्यामध्ये काम करण्यासाठी लहान मुले कमी वेतनात कमी मजुरीत मिळू लागली .मोठ्या वयाच्या कामचुकार कामगारापेक्षा ही मुले अधिक प्रामाणिक व एकनिष्ठ असतात त्यामुळे विविध प्रकारच्या खाणी, कारखाने ,वीटभट्ट्या अशा ठिकाणी बाल कामगारांना कामे दिल्या जाऊ लागली. पुष्कळदा एका घरात अशी पैसे मिळविणारी चार ते पाच मुले असतात त्यांना शिक्षणाचा गंधही नसतो व त्यांना त्याची गरजही वाटत नाही. याच्या जोडीला शहरात काम करणारे घरगडी ,मोलकरीण यांच्या बरोबरही त्यांची मुले त्यांना मदत म्हणून भांडी घासणे ,फरशी पुसणे, कपडे धुणे ,अशी विविध कामे करीत असतात व त्यांची संख्याही खूप जास्त आहे. ती कायद्याच्या कक्ष बाहेरच राहते मालकांच्या न्यायबुद्धीवर त्यांचे कामातील कष्ट व हाल कमी जास्त होत असतात त्यांच्याकडे मुले म्हणून पाहिले जाण्याची दृष्टी व त्या कामासाठी त्यांच्यावर होणारी सक्ती टाळणे आवश्यक असली तरी अवघड आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

1) समाजामध्ये बालकामगार विषयी जागृती निर्माण करणे.
2) बालकामगार समस्येच्या संदर्भात सरकारच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**मानवाधिकाराची पार्श्वभूमी -**

जरी आधुनिक मानवी हक्क चळवळीस दुसऱ्या महायुद्धानंतर जोर मिळाला तरीही ही संकल्पना सर्व प्रमुख धर्म संस्कृती आणि तत्त्वज्ञानात दिसून येते. इतिहासात मानवाधिकाराविषयीचा सर्वात जुना संदर्भ इसवी सन पूर्व.2350 सालातील लगास मधील उरूकागिना येथील सुधारणेबाबत येतो. त्यानंतरचा त्याचा उल्लेख नव-सुमेरियन संस्कृतीतील उर-नमूच्या संहितेमध्ये आढळतो प्राचीन इराणी साम्राज्याने इसवी सन पूर्व 539 मध्ये घोषित केलेले 'सायरस वृत्तचित्ती' हा मानवी हक्क विषयीचा पहिला लिखित दस्तऐवज मानण्यात येतो. या वृत्तचित्ती द्वारे गुलामांची प्रथा संपुष्टात आणली भारतातील मौर्य साम्राज्याने घालून दिलेली तत्वे तत्कालीन काळात अभूतपूर्व होती. कलिंग युद्धामुळे सम्राट अशोकाच्या धोरणामध्ये मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले. मॅग्नाकार्टा नावाची सनद इसवी सन 1215 मध्ये इंग्लंडमध्ये जाहीर करण्यात आली. आजच्या संसदीय व्यवस्थेची मुळे या सनदेत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर 1949 मध्ये भरलेल्या जिनेव्हा परिषदेत मानवाधिकारांचा वैश्विक घोषणा पत्रांच्या मागणीस जोर मिळाला. भारतात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना 12 ऑक्टोबर 1993 रोजी मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या कायद्याअंतर्गत करण्यात आला. ज्यात नंतर 2006 मध्ये मानवी हक्क संरक्षण कायद्याद्वारे सुधारणा करण्यात आली.

बालकामगार म्हणजे काय?

बाल कामगाराविषयी विविध संघटनांनी वेगवेगळे अर्थ सांगितलेले आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या बालपणापासून वंचित ठेवून लहान वयामध्ये त्यांच्याकडून जबरदस्तीने काम करून घेतल्या जाते किंवा काम करण्यास भाग पाडल्या जाते तेव्हा त्याला बालकामगार असे म्हणतात.

" उपजीविकेसाठी काम करणारी साधारणतः 15 वर्षाखालील वयाची मुले ज्या व्यवसायात कौशल्याची वा विशेष प्राविण्याची गरज नसते असे सर्व बालक म्हणजे बालकामगार होय".

**बालमजुरांच्या समस्या व स्वरूप -**

भारत हा विकसनशील देश असल्यामुळे येथील लोकसंख्या अतिशय वेगाने वाढत असल्यामुळे प्रत्येकाला रोजगार मिळणे कठीण झाले आहे. रोजगार नसल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य, गरीबी बेरोजगारी, कुपोषण, पोषक आहाराची कमतरता, झोपडपट्ट्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या गरिबीतूनच बालमजूर निर्माण होताना दिसते.

1) शिक्षणाचा अभाव भारतामध्ये गरिबीचे प्रमाण जास्त असल्यामुळे पालक वर्ग मुलांना उच्च पद्धतीचे शिक्षण देऊ शकत नाही व त्यांना ते परवडत नाही त्यामुळे ते शिक्षणापासून वंचित राहतात.
2) कमी उत्पन्न कुटुंबातील लोकांची संख्या जास्त असल्यामुळे कमी उत्पन्नात घर चालवणे त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही म्हणून घरातील प्रत्येक व्यक्तीला काम करावे लागते त्यामुळे लहान मुलांना सुद्धा कामाला लावले जाते.
3) लोकसंख्येचे अधिक प्रमाण भारतामध्ये अनेक रूढी परंपरेनुसार बालकांचे कमी वयातच विवाह केला जातो म्हणून या वयात प्रजनन दर जास्त असतो त्यामुळे देशाची लोकसंख्या वेगाने वाढून बालकामगार वाढण्यास मदत होते.
4) आर्थिक विषमता देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण योग्य पद्धतीने झाले नसल्यामुळे श्रीमंत हा अधिक श्रीमंत आणि गरीब हा अधिक गरीब होत गेला त्यामुळे समाजात आर्थिक विषमता निर्माण झाली. यामुळे सुद्धा बालमजुरांच्या संख्येत वाढ झाली.
5) किशोरवयीन मुलांसाठी योग्य कामाच्या संधीचा अभाव.

**बालकामगार थांबविण्यासाठी सरकारची भूमिका -**

देशातील बालकामगार पूर्णपणे संपविण्यासाठी सरकार विविध प्रयत्न करीत आहे. ते पुढील प्रमाणे

1) बालकामगार अधिनियम कायदा 1986 नुसार देशातील बालकामगारासाठी एक कायदा करण्यात आला त्यानुसार देशातील 14 वर्षाखालील मुले कोणत्याही ठिकाणी काम करताना दिसली तर त्या व्यक्तीच्या विरोधात कडक कार्यवाही करण्यात येईल.
2) 1948 चा कंपनी कायदा या कायद्याद्वारे एखाद्या कंपनीमध्ये मुले आपल्या इच्छेने काम करत असतील तर 14 ते 18 या वयोगटातील बालकामगारांना ओळखपत्र दिले पाहिजे तसेच त्यांना दिवसातून फक्त 4 तासच कामावर लावले पाहिजे.
3) 1952 चा खान कामगार कायदा या कायद्यानुसार सोळा वर्षाखालील मुलांना खाणीमध्ये काम करण्यास सक्त मनाई आहे.
4) बालकांना मोफत आणि सक्तीचा शिक्षण कायदा 2009 हा कायदा 2009 मध्ये बनविण्यात आला. या कायद्यानुसार 6 ते 14 वर्ष वयोगटातील मुलांसाठी योग्य आणि सक्तीचे शिक्षण घेण्याचा हक्क देण्यात आला. 14 वर्षापर्यंत मुलांना मोफत शिक्षण देण्यात येईल.
5) 2020 चा बाल कायदा या कायद्यानुसार जर कोणी व्यक्ती लहान मुलांना काम करण्यास भाग पाडत असेल तर त्याच्या विरोधात कठोर कार्यवाही करण्यात येईल.

**बालमजुरा विषयी संसदेत पारित झालेली विविध कायदे -**

बाल कामगारांना संरक्षण देण्यासाठी सरकारने संसदेत विविध कायदे पारित केलेले आहे पुढील प्रमाणे

1) बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा 1986.
2) बाल न्याय संरक्षण आणि बाल संरक्षण कायदा 2000.
3) बाल हक्क संरक्षण कायदा 2006.
4) बालविवाह प्रतिबंध कायदा 2006.
5) लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण कायदा 2012.
6) POCSO कायदा 2012.
7) अन्नसुरक्षा कायदा 2013.

हे महत्त्वाचे सरकारी कायदे आहेत ज्या अंतर्गत बाल कामगारावर काही प्रमाणात नियंत्रण बसेल.

**निष्कर्ष -**

बालकामगार समस्या ही सामाजिक समस्येचा एक घटक आहे. 12 ते 14 वर्षाखालील मुलांना घर खर्च चालविण्यासाठी शरीर कष्ट करून अर्थाजन करावे लागणे ही त्यांच्यावर अन्याय करणारी गोष्ट आहे. मोठेपणी शरीर कष्टावर अर्थार्जन करणे वेगळे समाजातील आर्थिक दृष्टीने दुर्बळ असलेल्या वर्गातील मुलांची ही समस्या समाजाचे असंतुलन व्यक्त करणारे आहे. यातून जगाबद्दलचा कडवट दृष्टिकोन निर्माण झालेले नागरिक घडतात. व समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येते. म्हणून एक प्रकारे बालकामगार समस्या ही समाज स्वास्थ्य बिघडवणारी आहे. ही समस्या नवीन नाही. शहरीकरण व वाढती कारखानदारी, वाढती लोकसंख्या यामुळे कमी वेतनात कामगार उपलब्ध असल्याने ही समस्या आटोक्यात आणणे कठीण झाले आहे. एकीकडे अशा मुलांनी शारीरिक कष्टाची कामे करणे हे त्याचे बालपण हिरावून घेण्यासारखे आहे. तर दुसरीकडे त्यांना नोकरीवरून काढून टाकले तर त्यांच्या घरातील माणसांवर उपासमारीची वेळ येईल म्हणून कायद्याने त्याला बंदी घालूनही घरच्या उपासमारीशी त्याचे कष्ट निगडित असल्याने या समस्यांना आळा बसत नाही.

यावर उपाय म्हणून त्यांना अधिक कष्टाची व धोकादायक कामे देण्यावर बंदी घातली गेली तसेच त्यांच्या कामाचे तासही ठरवून दिले. विषम अर्थव्यवस्था, शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी, लोकसंख्या, अशिक्षित पणा, पालकत्वाची जाणीव नसणे, वाढती गुंडगिरी अशा अनेक समस्यांचा गुंथा बालकामगार समस्येची निगडित आहे. संस्कार व शिक्षण यांचा अभाव असलेली व समजदारी नसलेल्या वयात हातात पैसा असलेली ही पिढी व्यसनाधीनतेकडे वळते, गुन्हेगारीकडे आकर्षित होते. व त्यांचे प्रश्न गंभीरपणे लक्षात आणून देणारी प्रतिनिधीही नाही. त्यांना निदान योग्य व सकस आहार देणे, शिक्षण सुविधा पुरविणे, धोकादायक कामावर न नेमणे, इत्यादी गोष्टीच्या संदर्भात जगभर कायद्याची मदत होऊ लागली आहे. पण समाज मनात जागृती निर्माण होणे व मुख्य म्हणजे ज्या इतर

सामाजिक समस्येमुळे ही समस्या उद्भवते त्यांना अटकाव बसेल असे वातावरण समाजात निर्माण करणे शक्य झाले पाहिजे. बालकामगार ही समाजाला लागलेली किड आहे.

संदर्भ सूची -


- श्री. गोजमे मच्छिंद्र "भारतातील बाल कामगारांच्या समस्या".
- जोशी. आर. पी 'मानवाधिकार व कर्तव्य'- अभिनव प्रकाशन नांदेड.
- अरुण चतुर्वेदी, संजय लोढा,' भारत मे मानवाधिकार' पंचशील प्रकाशन जयपुर.
- राष्ट्रीय मानवाधिकार आयोग रिपोर्ट वेबसाईट.
- इंगळे.व्ही. एस. 'मानवी अधिकाराचा ऐतिहासिक आढावा' अल्फा पब्लिकेशन नांदेड.
- Sudha Ojha - "Youth & Chaild Labour".
- "Human Rights" Dr. H.O. Agrawal.
- जोशी,कदम आणि जाधव 2011 "विशेष शिक्षण" विद्या प्रकाशन नागपूर.
- http://www.bba.org.in.